
मदर जोन्सचा विजय असो

लेखिका: **जीन बेथेल**

चित्रे: **कॅथलीन गॅरी-मॅकॉर्ड**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**






मदर जोन्सचा विजय असो

लेखिका: **जीन बेथेल**

चित्रे: **कॅथलीन गॅरी-मॅकॉर्ड**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**

अनुक्रमणिका



प्रकरण १

माझे नाव जेम्स


फिलाडेल्फिया, नोव्हेंबर १९०३

ही माझी बहीण एमी.

ती फक्त सात वर्षांची आहे.

या घाणेरड्या जुन्या गिरणीत आम्ही काम करतो.

हे जगातील सर्वात वाईट काम आहे.



आम्ही दिवसातील बारा तास काम करतो.
आम्ही शाळेत जात नाही.
आम्हाला सूर्यप्रकाश कधीच दिसत नाही.
आम्ही सदैव दमलेले असतो.
काही वेळा आम्हाला अपघात होतो आणि आम्ही जखमी होतो.
आम्हाला आठवड्याला दोन डॉलर इतकाच पगार मिळतो.



तिकडे आहेत ते आमचे वडील.
त्यांना आठवड्याला तेरा डॉलर मिळतात.
आमच्या कुटुंबासाठी ते पुरेसे नाही.
म्हणून मला आणि एमीला काम करावे लागते.
आम्हाला ते अजिबात आवडत नाही.
इथे काम करणे कोणालाच आवडत नाही.

आम्हाला मालक देखील मुळीच आवडत नाहीत. ते दुष्ट आहेत.
ते आम्हाला पुरेसा पगार देत नाहीत.
ते श्रीमंत होतात आणि आम्ही मात्र गरीबच राहतो.
हे योग्य नाही असे आम्हाला वाटते.






प्रकरण २

मदर जोन्स

फिलाडेल्फिया, जून १९०३

गेल्या उन्हाळ्यात आम्ही याबद्दल काहीतरी करण्याचा प्रयत्न केला.
आम्ही मालकांना भेटायला गेलो.
"कृपा करून आमचा पगार वाढवा," बाबा म्हणाले,
"म्हणजे आमच्या मुलांना काम करावे लागणार नाही."
"आम्हाला शाळेत जायचे आहे," मी म्हणालो.
पण ते काही ऐकायलाच तयार नव्हते.
"जा, जाऊन कामाला लागा, नाहीतर मी तुम्हाला काढूनच टाकेन!"





आम्हाला फार राग आला.

आम्ही तिथून बाहेर पडलो.

आम्ही सगळे संपावर गेलो.

आम्ही गिरणी समोर गोल गोल चकरा मारल्या.

मालकांनी आमचा पगार वाढवण्याची

आम्ही वाट पाहत होतो.

एक दिवस मदर जोन्स नावाच्या एक बाई गिरणीत आल्या.
त्या म्हाताऱ्या- म्हणजे माझ्या आजीएवढ्या - होत्या.
पण त्या खूप उत्साही आणि धीट होत्या.
गिरणीच्या मालकांकडे पाहून आपली मूठ वळवून त्या म्हणाल्या,
“तुम्हाला शरम वाटायला हवी.
मोठ्या माणसांनी करावे असे काम
तुम्ही लहान मुलांकडून करून घेत आहात!”
“मदर जोन्सचा विजय असो!” आम्ही ओरडलो.
“या मुलांना मोकळे करा!” त्या ओरडल्या.
“मुळीच नाही,” मालक म्हणाले.
“मग आम्ही राष्ट्राध्यक्षांना भेटायला जाऊ!”
मदर जोन्स म्हणाल्या.
“पण ते काय करतील?” माझ्या वडिलांनी विचारले.
“ते आमचा पगार वाढवून देतील का?
ते आमच्या मुलांना गिरणीतील कामापासून दूर ठेऊ शकतील का?”
“पाहूया तर खरे!” मदर जोन्स म्हणाल्या.
“आपण त्यांच्याकडे मदत मागू. लोकांना मदत करणे
हेच तर राष्ट्राध्यक्षांचे काम आहे.”
“जय हो!” आम्ही ओरडलो.
“आपण सगळेच राष्ट्राध्यक्षांना भेटायला जाऊया!”






प्रकरण ३

मोठ्या मोर्चाची सुरुवात

फिलाडेल्फिया, ७ जुलै, १९०३

आमच्या मोर्चाबाबत वर्तमानपत्रात एक मोठा लेख छापून आला.
गावातले सगळे लोक आम्हाला निरोप द्यायला आले.


मदर जोन्स आमचे नेतृत्व करत होत्या.
मी आणि बाबा त्यांच्या मागेच होतो.
आणि आमच्यामागे सुमारे २०० लोक होते.
एमीला यायचे होते, पण ती फार लहान होती.
म्हणून ती आई आणि बाळासोबत घरीच राहिली.





आम्हाला खूप मजा आली. गाणी लावली होती.
लोक आम्हाला प्रोत्साहन देत होते.
आणि आम्ही चालत होतो. एक-दोन, एक-दोन!
आम्हाला खूप लांब जायचे होते.
राष्ट्राध्यक्ष त्यांच्या उन्हाळ्यातील निवासस्थानी होते.
ते १२५ मैल दूर होते. एक-दोन, एक-दोन!
किती दूर जायचे आहे याची आम्हाला मुळीच चिंता नव्हती.
घाणेरड्या गिरणीतून बाहेर पडलो म्हणून आम्ही खुश होतो.
वाटेत लोक आम्हाला पाणी आणि जेवण देत असत.
आम्ही चालता चालताच जेवत होतो.
दिवसा खूप गरम होत असे. काही वेळाने
आमची गती संथ होऊ लागली.
मदर जोन्स दमलेल्या दिसत होत्या.
मी त्यांना एका घोडागाडीत बसायला मदत केली.
त्यांनी लहान मुलांना देखील त्यांच्यासोबत गाडीत बसवले.






चार वाजण्याच्या सुमारास आम्ही थांबत असू.
आम्ही शेतात पडून आराम करत असू.
“आपण आजची रात्र इथेच राहूया,”
मदर जोन्स म्हणाल्या.
मी मोठ्या माणसांना तंबू लावायला मदत केली.
जेवण झाल्यावर आम्ही गप्पा मारल्या आणि गाणी म्हटली.
बाबांना झोप लागली.
मी बराच वेळ आकाशातले तारे पहात बसून राहिलो होतो.
पण मी आनंदात होतो.
मला कधीच गिरणीत परत जायचे नव्हते.







प्रकरण ४

वाटेतील अडचणी

पेनसिल्व्हानिया, ८-१० जुलै, १९०३

दुसरा दिवस फारच गरम होता.
उन्हाचे चांगलेच चटके बसत होते.
आमची चालण्याची गती संथ झाली होती.
लोक आता आजारी पडू लागले होते.
“आम्ही परत जातो!” काहीजण म्हणाले. “उन्हाचे चटके बसत आहेत.”
बरेच जण तिथून परत फिरले आणि घरी गेले.
दुसऱ्या दिवसाच्या अखेरीस मोर्चात केवळ १०० लोक राहिले.
“एवढ्यात हार मानू नका,” मदर जोन्स म्हणाल्या.
“आपल्याला अजून खूप मोठा टप्पा गाठायचा आहे.”
तिसऱ्या दिवशी पाऊस पडला. रस्त्यात चिखल झाला होता.
गाड्या त्यात अडकून पडू लागल्या.
मी त्या ढकलून बाहेर काढायला मदत केली.
त्यांनतर डास आणि इतर किडे आले.
ते कानाशी गुणगुणून चावू लागले. त्याने सगळेच वैतागले.
मग आणखी काही लोक घरी परत गेले.

त्यानंतरच्या दिवशी बाबांच्या पायाला लागले.
त्यांना चालायला फारच त्रास होऊ लागला.
“आपण घरी जाऊया,” ते म्हणाले.
“पण मला राहू द्या ना,” मी विनवणी केली.
“मला राष्ट्राध्यक्षांना भेटायचे आहे.”
“ठीक आहे, बाळा. गुड लक!”
ते म्हणाले आणि मला मायेने जवळ घेतले.

मदर जोन्स माझ्याकडे पाहून हसल्या.
“शाबास जेम्स, असाच धीर धर! हताश होऊ नकोस.”
“हो,” मी म्हणालो, “तुम्ही जाणार असाल, तर मी पण येणार! ”





प्रकरण ५

न्यू जर्सीतील वाटचाल

न्यू जर्सी, ११-२३ जुलै १९०३

न्यू जर्सीला जाणारा पूल ओलांडला,
तेव्हा आम्ही केवळ साठ जणच राहिलो होतो.
“आपलं छान चाललं आहे!” मदर जोन्स म्हणाल्या.
दररोज आमची वाटचाल चालू होती.
आम्ही अनेक शहरांत थांबलो.
प्रत्येक ठिकाणी मदर जोन्सनी भाषणे दिली.
त्यानंतर आम्ही टोपी फिरवायचो आणि
लोक त्यात पैसे टाकत.

आमच्या मोर्चाला चांगली प्रसिद्धी मिळत होती.
वृत्तपत्रांनी त्याला ‘गिरणी कामगार मुलांचा मोर्चा’
असे नाव दिले होते.






एका रात्री आम्ही एका हॉटेलात झोपलो.
मी यापूर्वी हॉटेल कधीच पहिले नव्हते.
मला ते आवडले. संबंध पलंगावर मी एकटाच होतो!
परंतु बहुतेक रात्री आम्ही शेतात
किंवा रिकाम्या इमारतीत झोपत असू.



मी खूप मळलो होतो आणि दमलोही होतो.
पण मला त्याचे काहीच वाटत नव्हते.
मी राष्ट्राध्यक्षांना भेटायला निघालो होतो.
कदाचित ते माझ्याशी हस्तांदोलनही करतील!

आम्ही पुढे पुढे जात राहिलो. मग आम्ही हडसन नदीपाशी आलो.
दुसऱ्या बाजूला आता न्यूयॉर्क शहर दिसत होते.
केव्हा एकदा तिथे पोचतो असे आम्हाला झाले होते.




प्रकरण ६

अखेर न्यूयॉर्कला पोचलो


२३ जुलै १९०३

आम्ही एका मोठ्या बोटीतून नदी ओलांडली.
त्यात फारच मजा आली.
मला तर दिवसभर बोटीवरच राहायचे होते.

अखेर आम्ही न्यूयॉर्कला पोचलो.
काय ते शहर!
किती लोक!
त्या उंच उंच इमारती!
केवढा तो आवाज!



“थांबा!” एक पोलीस ओरडला.
“तुम्हाला इथे मोर्चा नेता येणार नाही!”
मला खूप भीती वाटली.



“काहीतरीच!” मदर जोन्स म्हणाल्या.

“आम्ही मेयरना विचारून येतो.”

“मेयर साहेब, तुम्ही आम्हाला मोर्चा घेऊन जाऊ द्यायला हवे. आम्ही या गरीब मुलांना मदत मिळवण्याच्या प्रयत्नात आहोत.”

“मग जरूर पुढे जा!” मेयर म्हणाले.

“मला अशा मिरवणुका आवडतात!”







आमची मिरवणूक चांगली मोठी आणि छान होती.
खूप लोक ती पहायला आले.
मदर जोन्सनी मला स्टेजवर बसवले.
“या गरीब मुलाकडे पहा.
दोन घास मिळवण्यासाठी त्याला गिरणीत काम करावे लागते.”
“मला शाळेत जायचे आहे,” मी म्हणालो.
“मला लिहायला -वाचायला शिकायचे आहे.”
लोकांनी टाळ्या वाजवल्या.
दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात माझ्याबद्दल छापून आले होते.
मदर जोन्सनी ते मला वाचून दाखवले.
माझ्या घरच्यांना किती अभिमान वाटेल.








प्रकरण ७

कोनी बेटाची सहल

कोनी बेट, न्यूयॉर्क, २७ जुलै १९०३

त्यानंतर आम्ही कोनी बेट पहायला गेलो.
आम्ही समुद्रकिनाऱ्यावर चाललो.
आम्ही एक जंगली जनावरांचा खेळ पाहिला.
त्या रात्री जेव्हा मदर जोन्सनी भाषण दिले,
तेव्हा आम्ही रिकाम्या पिंजऱ्यात बसलो.
आम्ही जनावरांच्या ओरडण्याची नक्कल केली
आणि पिंजऱ्याच्या सळ्या जोरजोरात हलवल्या.
"ही बिचारी मुले पाहिलीत का?" त्या म्हणाल्या.
"जनावरे जशी पिंजऱ्यात अडकतात,
तशी ती गिरणीत अडकली आहेत.
मुलांना कामगार बनवणे गुन्हा आहे.
आपण हे कायदे बदलले पाहिजेत.
थिओडोर रुझवेल्ट, आम्ही येत आहोत!"




प्रकरण ८

राष्ट्राध्यक्षांचे उन्हाळी निवासस्थान

ऑईस्टर बे, न्यूयॉर्क, २९ जुलै १९०३

मदर जोन्स राष्ट्राध्यक्षांना भेटण्यासाठी आम्हा पाच जणांना बरोबर घेऊन गेल्या.
रुझवेल्ट मला काय म्हणतील याचाच मी विचार करत होतो.

मग आम्ही फाटकापाशी पोचलो.
टेकडीवरचा त्यांचा भव्य प्रासाद आम्हाला दिसत होता.
त्यांची काही मुले गवतावर खेळत होती.
“नशीबवान आहेत!” मदर जोन्स म्हणाल्या.
“त्यांना काही गिरणीत काम करावे लागत नाही.”



दोन अधिकारी फाटकापाशी आले.

“मदर जोन्स ना?” ते म्हणाले.

“राष्ट्राध्यक्ष महोदय तुम्हाला भेटू शकणार नाहीत.”

मदर जोन्सना धक्का बसला.

“ते आम्हाला भेटणार नाहीत?

आम्ही बावीस दिवस पायपीट करून इथे आलो आहोत.

आणि आता तुम्ही म्हणता की ते आम्हाला भेटणार नाहीत?”

“माफ करा, मॅडम, रुझवेल्ट साहेब म्हणतात की,

ते तुम्हाला काही मदत करू शकणार नाहीत.”





“मला वाईट वाटते, मुलांनो,” मदर जोन्स म्हणाल्या.

“तुम्ही वाईट वाटून घेऊ नका,” मी म्हणालो.

“आपण शक्य ते सर्व केले.”

पण त्यांना खूप वाईट वाटले. आणि मला देखील.

मला परत गिरणीत काम करायचे नव्हते.

पण आता सर्वच संपले होते. आमचा मोर्चा अयशस्वी झाला होता.

आम्ही आगगाडीने घरी परत आलो.



प्रकरण ९

गिरणीतील कामावर परत

फिलाडेल्फिया, नोव्हेंबर १९०३

आणि मी पूर्वीच्याच कामावर परत आलो आहे.

मला आणि एमीला अजूनही आठवड्याला दोन डॉलर मिळतात.

इथे खूप गोंगाट आणि घाण आहे.

आम्हाला अजूनही हे आवडत नाही.

पण ऐका! हा कसला आवाज आहे?

लोक टाळ्या वाजवत आहेत.



मदर जोन्स परत आल्या आहेत!
“मी तुमच्यासाठी एक चांगली बातमी आणली आहे,” त्या म्हणाल्या.
“आपला मोर्चा काही अगदी अयशस्वी झाला नाही.
गव्हर्नर साहेब आपल्याला मदत करणार आहेत!”
“हुर्रे! जय हो!
मदर जोन्सचा विजय असो!”

“कधीतरी कायदे बदलतीलच,” त्या आम्हाला म्हणाल्या.
कधीतरी तुम्हाला देखील चांगले दिवस येतील.”
बाबांना, एमीला आणि मला हे ऐकून आनंद झाला.
आता आम्हाला काहीतरी आशा दिसू लागली.



लेखिकेची टिप्पणी

मदर जोन्स खरोखर अस्तित्वात होत्या. अमेरिकेतील सर्वच लहान-मोठ्या कामगारांची परिस्थिती सुधारावी यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

१९०३ साली, म्हणजे या पुस्तकातील काळात, खाणी, गिरण्या आणि कारखान्यात काम करणाऱ्या १४ वर्षाखालील मुला-मुलींची संख्या दहा लाखांहून अधिक होती.

हे काम कठीण व धोकादायक होते. कोळशाच्या खाणीतील काळ्या धुळीमुळे किंवा सुताच्या गिरणीतील कापसाच्या कणांमुळे अनेकांना फुफ्फुसांचे आजार झाले. कारखान्यातील यंत्रांमध्ये हात किंवा हाताची बोटे अडकण्यामुळे अनेकांना अपंगत्व येत असे. सर्वात वाईट म्हणजे, या मुलांना कधी शाळेत जाण्याची संधीही मिळत नसे. ही मुले मोठी झाली तरी त्यांना लिहिता-वाचता येत नसे.

१८७० ते १९३० या काळात मेरी हॅरिस जोन्स यांनी कामगारांना कामाचा पुरेसा मोबदला मिळावा आणि कामाच्या ठिकाणची परिस्थिती आरोग्यपूर्ण असावी यासाठी लढा दिला. पश्चिम व्हर्जिनियातील कोळशाच्या खाणी ते कोलोरॅडो मधील तांब्याच्या खाणी आणि पेनसिल्व्हेनिया व अलाबामा मधील कापडाच्या गिरण्या असा त्यांनी प्रवास केला आणि त्यादरम्यान अनेक सभा घेतल्या, भाषणे केली, आणि कामगारांना आपल्या हितासाठी एकजूट करण्याचे आवाहन केले. त्या अमेरिकेतील कामगारांच्या पहिल्या महिला नेत्या होत्या.

राष्ट्राध्यक्ष थिओडोर रुझवेल्टना भेटण्यासाठी मुलांचा मोर्चा घेऊन निघाल्या त्यावेळी मदर जोन्स ७३ वर्षाच्या होत्या. रुझवेल्ट जरी बालकामगार या प्रथेविरुद्ध असले, तरी बालमजुरी बेकायदेशीर ठरविण्यासाठी ते लोकप्रतिनिधी गृहाचे मन वळवू शकले नाहीत. अखेर त्यांनतर पस्तीस वर्षांनी असा कायदा करण्यात आला.

परंतु, मुलांचा हा कठीण आणि दूरवरचा मोर्चा पूर्णपणे वाया गेला नाही. मदर जोन्सनी आपल्या आत्मचरित्रात त्याबद्दल पुढीलप्रमाणे लिहिले आहे:

बालमजुरी हा गुन्हा आहे, याकडे आम्ही देशाचे लक्ष वेधले. गिरणी कामगारांचा संप जरी अयशस्वी झाला आणि मुलांना कामावर परत जावे लागले, तरी पेन्सिल्व्हेनियाच्या विधिमंडळाने लवकरच बालमजुरीविरोधी कायदा केला आणि गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो मुलांना घरी पाठवले व इतर हजारो मुलांना वयाच्या चौदा वर्षापर्यंत बालकामगार होण्यापासून वाचवले.

